# मिरा भाईदर महानगरपालिका
## सा.महासभा दि.१०/०४/२००८

प्रकरण क्र. ०३ :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील पे अ‍ॅन्ड पार्क (वाहनतळ) बाबत.

ठराव क्र. ०३ :-

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील पे अ‍ॅन्ड पार्कच्या नव्याने जागा उपलब्ध करणेकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्यात आले होते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४३ (अ) अन्वये पे अ‍ॅन्ड पार्कवरती (वाहनतळावरती) नियंत्रण करण्याची तरतूद आहे.

जाहिरात विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग याच्या अहवालानुसार खालीलप्रमाणे पे अ‍ॅन्ड पार्कच्या जागा (स्थळ) जुन्या दोन व नविन चार अशा सहा जागा प्रस्तावित आहेत.

(अ) पे अ‍ॅन्ड पार्कच्या (वाहनतळाच्या) जागा

| अ.क्र | झोन क्र. | स्थळ | सध्याची स्थिती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | १ | मिरा रोड रेल्वे स्टेशन जवळ आरक्षण क्र.१८४. | चालू आहे. |
| २ | २ | मिरा रोड, शांतीस्टार शॉपिंग सेंटर समोर रिक्षा स्टॅन्ड ते मच्छी मार्केटनाका, पुनमसागर रोड, मिरा रोड (पु) गटाराच्या स्लॅबवर. | नविन प्रस्ताव |
| ३ | ३ | शांतीसागर हॉटेलच्या उजव्या बाजूच्या रोडवर, मिरा रोड स्टेशन (शांतीसागर हॉटेलच्या बाजूने) | नविन प्रस्ताव |
| ४ | ४ | जेसल पार्क,शिवसेना कार्यालयाकडून रेल्वे ट्रॅकच्या बाजूनी चौपाटीकडे जाणा-या रोडवर,भाईंदर (पु) (गटाराच्या स्लॅबवर) | नविन प्रस्ताव |
| ५ | ५ | एस.टी.स्टॅन्ड ते मच्छी मार्केट,जय अंबे झोपडपट्टीकडे जाणा-या रोडवर,भाईंदर (प.) (गटाराच्या स्लॅबवर) | नविन प्रस्ताव |
| ६ | ६ | रेल्वे उडाण ब्रीजखाली, भाईंदर (पु). | चालू आहे. (फक्त ६ महिन्यांकरीता) |

## (ब)- पे ॲन्ड पार्कचे सुधारीत दरपत्रक

| अ.क्र | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | खाजगी वाहने | ६ तासाकरीता | १२ तासाकरीता | २४ तासाकरीता | महिन्याचा पा |
| (I) | सायकल | रु.१ | रु.३ | रु.५ | रु.१०० |
| (ii) | दुचाकी वाहने | रु.५ | रु.८ | रु.१२ | रु.२७५ |
| (iii) | चार चाकी वाहने | रु.१० | रु.१५ | रु.२० | रु.४५० |
| २ | व्यावसायिक वाहने | | | | |
| (I) | दुचाकी/ तीन चाकी/ चार चाकी(टॅक्सी,टेम्पो,इ.हलकी वाहने, | रु.२० | रु.२५ | रु.५० | रु.१२०० |
| (ii) | ४/सहा चाकी - (ट्रक,बस, टुरीस्ट बस,इ. जड वाहने,) | रु.२५ | रु.५० | रु.१०० | रु.२५०० |

वरील नमुद केलेल्या मिरा भाईदर क्षेत्रातील सहा ठिकाणांवरील पे ॲन्ड पार्कच्या (वाहनतळाच्या) धोरणात्मक निर्णयास व प्रस्तावित प्रमाणे सुधारीत दरास मान्यता देण्यात येते.

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३२६ वर मंजुर विकास योजनेचे ट्रक टर्मिनल करीता मातीभराव करणे, ट्रक टर्मिनलकडे जाणारा रस्ता तयार करणे, तसेच ज्या ठिकाणी पे ॲन्ड पार्कसाठी (वाहनतळासाठी) जागा निश्चित करण्यात आल्या आहेत त्याठिकाणी गटारावर स्लॅब टाकणे, टेंपर मारणे (आर.ए.एम.पी), गटारालगत रेलिंग टाकणे इत्यादी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरीत करण्याकरीता तसेच कामे परिपुर्ण झाल्यानंतर त्यावर निविदा काढून निविदा मंजुर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

धोरणात्मक प्रस्तावाचा (पे ॲन्ड पार्कचा) तीन वर्षाकरीता ठेका देण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे निविदा मागवून निविदा मागविणार, तसेच नव्याने पे ॲन्ड पार्कच्या जागा उपलब्ध झाल्यास त्याबद्दलचा निर्णय घेण्यास मा.आयुक्तांस ही सभा प्राधिकृत करते.

उपरोक्त प्रस्तावाला ही मा.महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार

अनुमोदक :- श्री. धनेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा बुधवार दि. २०/०२/२०१३

**प्रकरण क्र. ४९ : मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याकरीता चर्चा करुन महासभेमध्ये चर्चा करुन महासभेमध्ये निर्णय घेणेबावत.**

ठराव क्र.:- ( ५७ )

मिरा-भाईंदर शहराचे भौगोलिक क्षेत्र ७९.०० चौ. कि.मी. असून २५ टक्के रहिवास क्षेत्रे व ७५ टक्के इतर आहे. शहराची लोकसंख्या आजमितीस १२ लाखापर्यंत पोहोचलेली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्याही वाढलेली आहे. सन २००८ मा. महासभा दि. १०/०४/२००८ प्र.क्र. ०३ ठराव क्र. ०३ अन्वये मा. आयुक्तांना प्राधिकृत केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून शहरामध्ये २३ ठिकाणी नवीन वाहनतळ **"पे अँन्ड पार्क"** च्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. मा. स्थायी समिती दि. ०५/०१/२०१३ ठराव क्र. ०४ अन्वये सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यांत आली व सदर विषयं मा. महासभेसमोर घेण्याचे सुचित करण्यांत आले.

मिरा-भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याची गरज व महापालिकेला होणा-या आर्थिक फायद्याच्या दृष्टीकोनातुन ~~दि. १०/०४/२००८ रोजी~~ प्रशासनाने ~~निविदामध्ये~~ प्रस्तावित केलेल्या २३ ठिकाणांमधून व इतर खाली उल्लेखलेल्या जागी सदरची कार्यवाही करावी.

१. गोल्डन नेस्ट सर्कल पोलीस चौकी ते इंदलोक पोलीस चौकी
२. स्मशान रोड ते इंद्रलोक, न्यू गोल्डन नेस्ट
३. दिपक हॉस्पीटल ते सेव्हन स्क्वेअर अॅकेडमी
४. शिवार गार्डन ते सरदार पटेल हायस्कुल
५. मॅडोना हॉटेल ते रामदेव पार्क
६. कन्नकिया रोड
७. एस.के. स्टोन समोर लतिफ पार्क गृहसंकुल ते डोंगरी झोपडपट्टी
८. जि.सी.सी.क्लब ते विद्यानगरी हाऊसिंग सोसायटी
९. झंकार पासुन ते आरएनए
१०. प्लेझंट पार्क ते एमआयडीसी
११. सृष्टी ते रॉयल कॉलेज रोड
१२. शितल नगर ते जाँगीड सर्कल (रस्त्याच्या एका बाजुला)
१३. एस.के.स्टोन ते शितल नगर सर्कल (गीता नगर संकुलाच्या लगत असलेला रस्ता)
१४. मिरा रोड ब्रम्हकुमारी सर्कल ते पुनम कॉम्पलेक्स मुख्य रस्ता
१५. मिरा रोड स्टेशन शांती शॉपींग सेंटर समोर स्काय वॉक खाली
१६. भाईंदर(पुर्व) जेसल पार्क रेल्वे समांतर शिवसेना शाखेच्या बाजुचा रस्ता
१७. शिवाजी पुतळा ते गोल्डन नेस्ट सर्कल रस्त्याच्या दोन्ही बाजुला
१८. शहरामध्ये महापालिकेचा आरक्षीत भूखंड जागा उपलब्ध असल्यास

तसेच भाईंदर (पश्चिम) रेल्वे स्टेशन जवळ, स्काय वॉक खाली वाहनतळ ठेका पध्दतीने चालविण्यासाठी मे. सुशिला ट्रेडींग कंपनी यांची निविदा एक वर्षाकरीता स्विकारण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे व यापूढे निविदा काढताना निविदेमध्ये टाकण्यांत येणा-या अटीशर्तीमधून सदरच्या कामाकरीता अनुभवाची अट काढून टाकावी ज्यामुळे जास्त लोकांना ठेका स्पर्धामध्ये सहभागी होता येईल व तद्नंतर याखेरीज वाहनतळ उभारण्याची जागा उपलब्ध असल्यास प्रशासनाने मा. महासभेमध्ये प्रस्तावित करुन मान्यताप्राप्त करावे व नामकरण झालेल्या प्रत्येक रस्त्याला दिशादर्शक / नो एन्ट्री, नो पार्कींग, वन-वे व इतर आवश्यक फलक ठिकठिकाणी शहरामध्ये लावण्यात यावेत, असा मी ठराव मांडत आहे.

सूचक : श्री. जूबेर इनामदार

अनुमोदक :
श्री. ध्रुवकिशोर पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

महापौर
सौ. कॅटलीन परेरा
मिरा-भाईंदर महानगरपालिका

१६

५३।१

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. न. मनपा / जाहिरात / ४७८ / २०१०-११ दिनांक : ११ / ११ / २०१०

O/C

प्रति,
मे.एस.एस.इंटरप्राईजेस,
फ्लॅट नं.१०१,बी-विंग,
जुपीटर अपार्टमेंट,पुनमसागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पु)

विषय :- मिरा रोड स्टेशनजवळील आरक्षण क्र.१८४ (झोन क्र.१) येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेच्या करारास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- १) आपणांबरोबर दि.२२/१०/२००८ रोजी झालेला करारनामा.
२) इकडील कार्यादेश जा.क्र.मनपा/जाहिरात/३९४/३९७/२००८-०९ दि.२३/१०/२००८.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगे आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा रोड (पु) स्टेशन जवळील,आरक्षण क्र.१८४ मधील वाहनतळ (पे ॲन्ड पार्क) ठेका पध्दतीने चालविण्याचे काम आपणांस संदर्भ क्र.२ च्या कार्यादेश अन्वये देण्यात आलेले आहे.

सदरहू वाहनतळांवर B.O.T. तत्वावर वाहनतळ बांधकाम करणेचे काम महानगरपालिकेने हाती घेतलेले आहे. सदरहू कामाचे कार्यादेश संबंधित ठेकेदारास मिळेपर्यत आपल्या सदरहू कामाच्या करारास पुढील अटीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

१) यापुर्वी आपण महानगरपालिकेशी दि.२२/१०/२००८ रोजी केलेल्या करारातील अटीशर्ती कायम राहतील.
२) यापुर्वी सादर केलेल्या बॅक गॅरटींची मुदत दि.१५/१२/२०१० रोजी संपत असल्याने करारनाम्यातील अटीशर्तीप्रमाणे रक्कम रू.९,४१,१११/- एवढया रक्कमेची सुरक्षा अनामत म्हणून दि.१६/१२/२०१० पासून १८ महिन्याकरीता वैध असलेली बॅक गॅरटी महानगरपालिकेस सादर करावी.

९६ ४३।११

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. नं. ____________ दिनांक : ____________

३) निविदेतील शर्त क्र.२५ अन्वये मागील वर्षातील महसूल रक्कमेच्या १० टक्के वाढीव महसूल रक्कम दि.१/११/२०१० रोजीपासून भरणा करावी. या अनुषंगे दरमहा महसूल रक्कम रु.१,५६,८५२/- एवढी होत असून प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत सदर रक्कमेचा भरणा करणे आपणांस बंधनकारक राहील.

४) सदरहू ठिकाणी B.O.T. तत्वावर वाहनतळ (पे ॲन्ड पार्क) बांधणेची प्रक्रिया सुरु असून सदरहू कामांचे कार्यादेश संबंधित एजन्सींना देईपर्यंत या कामाच्या कराराची मुदत वैध राहील. तदनंतर आपणांस सदरहू वाहनतळाची जागा त्वरीत महानगरपालिकस उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

उपआयुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

१२।११।१०

(९३)

२८१९

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. नं. मनपा/जाहिरात/३२४/३९५/०८-०९

दिनांक : २३/१०/०८

## // कार्यादेश //

प्रति,
मे.एस.एस.इंटरप्राईजेस,
फ्लॅट नं.१०१,बी-विंग,
जुपीटर अपार्टमेंट,पनुमसागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पु)

विषय :- मिरा भाईदर क्षेत्रातील ठेक्याने पे ॲन्ड पार्क झोन क्र.--09---
चालविण्याकरीता.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क झोन क्र. 09--- मा.स्थायी समिती सभा दि.१४/०८/२००८, ठराव क्र.४२ अन्वये तसेच महानगरपालिकेचा आपणांबरोबर दि. 22 / १०/२००८ रोजी झालेल्या करारातील अटीशर्तीना अधिन राहून आपणांस पे ॲन्ड पार्कचा ठेका झोन क्र. 09----- चालविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

सदरच्या परवानगीचा कालावधी दि.०१/११/२००८ पासून सुरु होईल. याची स्पष्ट नोंद घ्यावी.

Recd
[signature]
23/10/08

[signature]
उपआयुक्त (जाहिरात)
मिरा भाईदर महानगरपालिका

९९५५

दूरध्वनी: २८११२८२८ / २८११३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स: २८११७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१

जा. नं. मनपा / माहिरात / ८० / २०१५-१६ दिनांक : १७/०७/१५

// कार्यादेश//

प्रति,
मे.एस.एस. इंटरप्राईजेस
फ्लॅट नं.१०१,बी-विंग,
जुपीटर अपार्टमेंट,पुनमसागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पु) ४०१ १०७

विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. १८४, मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ, मिरारोड (पुर्व) येथे वाहनतळ (पे ॲण्ड पार्क) चालविणे कामाबाबत.

संदर्भ :- दि. १७/०७/२०१५ रोजीचा करारनामा.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. १८४, मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ, मिरारोड (पुर्व) येथे वाहनतळ (पे ॲण्ड पार्क) चालविणे कामाकरीता महानगरपालिकेने आपणाबरोबर दि.१७/०७/२०१५ रोजी केलेल्या करारातील तसेच निविदेतील अटीशर्तींच्या अधिन राहुन आपणांस पे ॲण्ड पार्क चालविणेकरीता दि.०१/०६/२०१५ ते दि. ३१/०५/२०१६ रोजी पर्यंत परवानगी देण्यांत येत आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका
17/07/15

Santosh Shukla

११८ प

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102257

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

- 3 JUL 2015

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

## // करारनामा //

### पे ॲन्ड पार्क अधिकार देणेकरीताचा करारनामा

हा करारनामा मुक्काम भाईदर,जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आज दिनांक १८ माहे ---जुलै-------- सन २०१५ रोजी करण्यात आला.

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका
भाईदर (पश्चिम)

प्रथम पक्षिय
(हयापुढे सोईचे दृष्टीने
"महानगरपालिका असा उल्लेख केला आहे."

आणि

मे.एस.एस.इंटरप्राईजेस,
फ्लॅट नं.१०१,बी-विंग,
जुपीटर अपार्टमेंट,पुनमसागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पु) ४०१ १०७.

द्वितीय पक्षिय
( हयापुढे सोईचे दृष्टीने "एजंट / ठेकेदार" असा उल्लेख केला आहे.)

यांच्यामध्ये होत आहे.

११८U

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102258

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

- 3 JUL 2015

द्वितीय / त्रितीय

ज्याअर्थी मिरा-भाईदर महानगरपालिका ही नागरी संस्था महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार स्थापन झाली आहे. आणि त्यांचे मुख्य कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,भाईदर (प.) ४०१ १०१ येथे आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २४३ (अ) अन्वये "महानगरपालिका" "वाहतुक पोलिस व आर.टी.ओ. इत्यादींशी सल्लामसलत करुन मिरा भाईदर शहरासाठी पैसे भरा आणि वाहने उभे करा (पे ॲन्ड पार्क) योजना प्रस्तावित केली आहे. आणि त्यासाठी वाहन चालक/मालकांकडून वाहने, नमुद वेळेत, नमुद ठिकाणी उभी करण्यासाठी लागणारे शुल्क (पार्कीग चार्जेस) वसुल करण्यासाठी मा. महासभा दि.१०/०४/२००८ ठराव क्र.०३ अन्वये ठराव पारीत करुन पे ॲन्ड पार्कचे दर मंजुर करण्यात आले आहेत."

ज्याअर्थी, महानगरपालिकेने पैसे भरा आणि वाहने उभी करा योजना आरक्षण क्र.१८४ मिरारोड स्टेशन जवळ, मिरारोड (पूर्व) क्षेत्र ६०० मिटर या जागी परिशिष्ट 'डी' मधील नमुद पार्कीग क्षमतेसाठी खाजगी संस्थेमार्फत एक वर्षाच्या कालावधीसाठी पे ॲन्ड पार्क योजना राबविणेकरीता आणि वाहन चालक/मालकांकडून पार्कीग चार्जेस वसूल करणे या प्रस्तावासाठी दि.३०/१२/२०१४ रोजी दै.लोकमत व दै.मिड- डे या वृत्तपत्रातून निविदा मागविलेल्या होत्या.

9235

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

T 102259

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

- 3 JUL 2015

आणि ज्याअर्थी ठेकेदार हयांनी महानगरपालिकेजवळ पैसे भरा आणि वाहने उभी करा (पे ॲन्ड पार्क) योजना चालविण्यासाठी आणि निवदि फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृतपणे वर्णन केलेल्या जागेत वाहनतळ चालविणेसाठी महापालिकेस प्रस्ताव प्रस्तुत केला आहे.

आणि ज्याअर्थी एजंट/ठेकेदार यांनी निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृत वर्णन केलेल्या वाहनाच्या जागेची देखभाल करण्यात व पैसे भरा आणि वाहने उभी करा योजना चालविणेत असलेला रस व तीव्र इच्छा पाहून महानगरपालिकचे समाधान होउन महापालिकने मा.स्थायी समिती सभा दिनांक ०८/०५/२०१५ ठराव क्र. २० अन्वये द्वितीय पक्षांचा प्रस्ताव (ठेकेदार यांचा) स्विकारला आहे.

आणि ज्याअर्थी कराराच्या अटी व शर्ती अन्वये एजंट /ठेकेदार यांनी महापालिकेला वार्षिक महसूल रक्कम रुपये ६९,३३,५५५/- (अक्षरी रुपये एकोणसत्तर लाख तेहतीस हजार पाचशे पंचावन्न मात्र) प्रस्तावापोटी दर्शविलेला आहे. त्यातील एक दिनदर्शिका वर्षासाठी १/१२ (समान मासिक हप्ता) याप्रमाणे प्रत्येक महिन्यात महसूल रक्कम रुपये ५,७७,७९७/- हप्त्यात अदा करणे आहे. एजंट / ठेकेदार हे प्रथम पक्षिय महापालिकेचे एजंट / ठेकेदार म्हणुन दि.०१/०६/२०१५ पासुन ते दि.३१/०५/२०१६ पर्यंत या १ वर्षाच्या नमुद कालावधीसाठी राहील.

यशस्वी ठेकेदार निविदेत नमुद केलेल्या वार्षिक महसूल रक्कमेच्या ५० टक्के इतकी बॅक गॅरन्टी दिल्यावर स्विकारपत्र मिळाल्यापासन सात दिवसांच्या आत पे ॲन्ड पार्क जागेचा ताबा

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये सत्यमेव जयते Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102260

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे - 3 JUL 2015

घेतील जर तसे न केल्यास ते सुरक्षा रक्कम आणि निविदा इसारा रक्कम जप्त होणेसे पात्र राहील. तसेच सदर सुरक्षा ठेव (**Security Deposit**) सात दिवसात जमा न केल्यास इसारा रक्कम (**E.M.D.**) जप्त करण्यांत येईल. परंतु अकस्मात येणा-या अटीशर्ती व कर्तव्याचे योग्यरीतीने पालन व पुर्ततेसाठी एजंट /ठेकेदार यांनी बिड बी फॉर्म मध्ये दर्शविलेली वार्षिक रक्कमेच्या ५० टक्के इतकी रक्कम रु.३४,६६,७७८/- (अक्षरी रुपयांची चौतीस लाख सहासष्ठ हजार सातशे अठ्याहत्तर मात्र ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाने २४ महिन्यांकरीता वैध असलेली प्रतिभूती ठेव (Security Deposit) रोख स्वरुपात/शेड्युल्ड बँक किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट किंवा बँक गॅरंटी स्वरुपात जमा करण्यात यावी. सदर कराराच्या अटीशर्तीचे पुर्तता होईपर्यत सुरक्षा ठेव (**Security Deposit**) वैध असेल. जी मुदत लवकर संपुष्टात येईल ती लागु होईल.

आणि ज्याअर्थी वरीलप्रमाणे एजंट /ठेकेदार यांनी ठेवी म्हणून जमा केलेल्या रक्कमेवरती कोणतेही व्याज आकारले जाणार नाही असे ठेकेदार मान्य करतात.

आणि ज्याअर्थी प्रस्ताव दस्तसऐवजांमध्ये नमुद केलेल्या अटी, शर्ती, निर्देश आणि सुचनांचे योग्य रितीने पालन करण्याची सर्व जबाबदारी एजंट/ठेकेदार हयांची आहे.

१२५

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये सत्यमेव जयते Rs. 500

INDIA NON JUDICIAL

T 102261

महाराष्ट्र MAHARASHTRA

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

- 3 JUL 2015

त्याअर्थी सदरचा करारनामा साक्षीदारांच्या समक्ष करण्यात येत असून उभयपक्षांमधील मान्य व कबुल करण्यात येत आहे. ते खालीलप्रमाणे :-

१) एजंट / ठेकेदार हे प्रथम पक्षिय महानगरपालिकेचे एजंट/ ठेकेदार म्हणून १ वर्षाच्या नमुद कालावधीसाठी राहील. तसेच कार्यादेशामध्ये (Work Order) नमुद केलेल्या तारखेपासून वाहनांवरील पैसे भरा आणि वाहने उभी करा वसुली करण्यास सहमत आहेत व मान्य करीत आहेत.

२) एजंट / ठेकेदार मान्य करतात की ते कार्यादेश मिळाल्याचे तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत वाहनतळाच्या जागेची देखभाल करणे व पे ॲन्ड पार्क योजना चालविणेसाठी ताब्यात घेतील. (वाहनतळाची जागा पुर्णपणे विकसित झाल्यानंतरच सदरच्या जागेत वाहन उभे करण्यास खुले करतील.) आणि तसे न केल्यास कोणतीही सुचना न देता E.M.D. तसेच सुरक्षा ठेव (Security Deposit) (तत्सम बॅक गॅरन्टी) जप्त करण्याचे हक्क महानगरपालिकेला आहेत.

३) ठेकेदार हे मान्य करीत आहेत की, करारनामा झालेल्या तारखेपासून तीस दिवसानंतर येणा-या सात दिवसांच्या आत ठेकेदार यांनी दर महिन्यांची मासिक महसूल रक्कम रुपये ५,७७,७९७/- एवढी मनपामध्ये भरणा करावी. उदा.माहे मे या महिन्याचा होणारा मासिक महसूल माहे १ ते

920 पु

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

T 102262

DIS. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

- 3 JUL 2015

७ जुन पर्यत महापालिकेत भरणा करावा. (सुट्टीचे दिवस वगळून) तसेच ठेकेदार हे मान्य करतात की, माहे मार्च महिन्यांची महसूल रक्कम त्याच महिन्यांच्या १५ तारखेपर्यंत महानगरपालिकेमध्ये भरतील. ठेकेदार यांनी वरील नमुद मासिक हप्त्याच्या रक्कमेचे १२ धनादेश 'मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या' नावे आगाऊ स्वरुपात महानगरपालिकेकडे कार्यादेश मिळाल्यापासुन सात दिवसांत सादर करावेत.

४) द्वितीय पक्षीय (एजंट / ठेकेदार) यांच्यावर वाहनतळाच्या जागेवरील फर्निचर म्हणजेच पार्कींग-नो पार्कींग चे फलक, वाहनतळाच्या जवळील रस्त्यावरील मार्गदर्शक खुणा, चालू अवस्थेत असलेली घडयाळे, चौकी (**Stall**) आणि पे ॲन्ड पार्क योजना योग्यरितीने कार्यान्वित (सुरु) व्हावी म्हणून दक्षता घेण्यासाठी इतर आवश्यक सर्व गोष्टी करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

५) महानगरपालिकेने वेळोवेळी काढलेल्या सुचनापत्रानुसार लागू केलेल्या दरांप्रमाणे नमुद वाहनांकडून पैसे भरा आणि वाहने उभी करा शुल्क वसुल करण्यास एजंट /ठेकेदार यांना कायदेशिर अधिकार देण्यात येत आहेत.

924

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये सत्यमेव जयते Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102263

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे - 3 JUL 2015

६) सदरचे वाहनतळाचे जागेबद्दल महानगरपालिकेने मंजुर केलेले दराप्रमाणे वाहने उभे करण्याचे शुल्क दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व त्याची देखभाल करणे एजंट / ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे.

७) "ही महानगरपालिकेची वाहनतळाची जागा आहे" असे दर्शविणारी इंग्रजी व मराठी मध्ये आवश्यक असणारे फलक वाहनतळाचे जागेच्या दर्शनीय भागात प्रदर्शित करणे व त्याची देखभाल करणे हे एजंट / ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे.

८) "उभी करण्यात आलेले वाहने ही वाहन मालकाच्या स्वतःच्या जोखमीवर उभी करण्यात आलेली असून कोणत्याही कारणांने वाहनतळावरील जागेत उभी केलेल्या वाहनांस कोणत्याही कारणाने कोणतेही नुकसान, हानी किंवा चोरी झाल्यास त्यास महानगरपालिका किंवा एजंट / ठेकेदार जबाबदार राहणार नाही. असे दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व लावणे व त्याची देखभाल करणे एजंट / ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे.

९) प्रसंगी जर एजंट / ठेकेदार यांनी सदरचे कराराची कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केला तर एजंट /ठेकेदार हयांनी जमा केलेले सुरक्षा ठेव (Security Deposit) आणि E.M.D. महानगरपालिकेकडून जप्त केले जाईल.

९३२४

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102264

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

- 3 JUL 2015

१०) वाहने उभी करण्याचे कामी जे काही महसूल कर, आणि कर आकारणी देणे असेल किंवा हयानंतर शासनाकडून किंवा काही इतर प्राधिकरणाकडून आकारण्यात येणारा किंवा देय असणारी सर्व देणी देण्याकरीता एजंट / ठेकेदार हयांनी मान्य व कबुल आहे. तथापि, सदरचा भार (खर्च) हा महापालिकेस येणा-या मासिक महसूल रक्कमेतून कोणत्याही प्रकारे कमी केला जाणार नाही.

११) एजंट / ठेकेदार यांनी मासिक महसूल रक्कम देण्यास कसुर केल्यास, सदर महानगरपालिकेकडे अन्य कायदेशीर उपाय योजना खुल्या असल्यातरी सदर एजंट / ठेकेदार हयांनी सदर महसूल रक्कम देय झाल्याच्या दिनांकापासून ते सदर रक्कम महानगरपालिकेस ज्यादिवशी मिळाली त्या दिवसापर्यत (दोन्ही दिवस मिळून) देय असलेल्या रक्कमेवरती दरसाल १८ टक्के दराने व्याज व देय असलेला मासिक महसूल रक्कम ठेकेदारास महापालिकेत भरावे लागेल. आणि अशी रक्कम एक महिन्यापेक्षा जास्त काळ स्वतःकडे ठेवल्यास किंवा अदा न केल्यास महानगरपालिकेस सदर करारनामा रद्द करणेचा अधिकार राहील. आणि अशावेळी सदर एजंट / ठेकेदार यांनी जमा केलेली प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा इसारा रक्कम किंवा दोन्हीही जप्त करणेंचा अधिकार महापालिकेस राहील.

९३३१

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

T 102265

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय,

ठाणे

- 3 JUL 2015

१२) पे ॲन्ड पार्क योजना सुरु होण्यापुर्वी उपआयुक्त (जाहिरात) यांच्याशी सल्लामसलत करुन वाहने उभी करण्याची पावती पत्रिका छापून घेणे एजंट / ठेकेदार हयांना मान्य आहे. महानगरपालिकेच्या उपआयुक्त (जाहिरात) यांची पुर्व मंजुरी घेवून भाडे पार्कीग चार्जेस वसुलीच्या पावती छापणे पध्दती मध्ये (उदा. प्रवेश-निर्गमन पत्रिका छापणे), काही बदल करावयाचा असेल तर ठेकेदार यांस सदरचे अधिकार राहतील. सदरची वाहने उभी करण्याचे तिकिटांमध्ये अनुक्रमाकांसोबत स्थळप्रत, पे ॲन्ड पार्क योजनेचे ठिकाण दर्शविणे, प्राधिकृत एजंट- ठेकेदाराचे नाव व्यापार, वाहन क्रमांक आत येण्याची व बाहेर जाण्याची वेळ, वाहने उभे करण्याचे मंजुर दराची यादी आणि वाहने वाहन मालकीचे जोखमीवर उभी करणे असे दर्शविणारी सुचना इत्यादींचा समावेश असावा आणि ही पावती पत्रिका वाहन-चालविण्याचे चाकासमोर **(Stearing Wheel)** ठेवावीत.

१३) एजंट / ठेकेदार मान्य करतात की, कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त वाहने उभी करण्याचे दर वाढविले जाणार नाहीत. एजंट / ठेकेदार मान्य करतात की, वाहनतळाची जागा २४ तास वाहने उभी करण्याकरीता खुली ठेवण्यात येईल.

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102266

DIST. TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय,

3 JUL 2015

१४) वाहनतळाची जागा वाहने उभी किंवा पार्कीगसाठीच वापरण्यात यावी. त्याव्यितिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीसाठी जागेचा वापर करणार नाहीत. असे एजंट /ठेकेदार मान्य करतात. तसेच सदरची जागा स्वच्छ, व्यवस्थित व चांगल्या स्थितीत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

१५) एजंट / ठेकेदार मान्य करतो की, कोणत्याही व्यक्तीस प्राधान्य न देता कटाक्षाने प्रथम येणा-यास प्रथम सेवा तत्वावर गाडी उभी करण्यास परवानगी आहे. कोणत्याही कंपनीच्या, कोणाही विशिष्ट व्यक्ती/व्यक्तींना मासिक परवाना पध्दती व्यतिरिक्त गाडया ठेवण्यास (उभ्या करण्यास) वाहनतळाची कोणतीही जागा/ठिकाणाचे आरक्षण देणार नाही. असे एजंट / ठेकेदार मान्य करतात. तसेच मनपाची वाहने किंवा सरकारी वाहने पे ॲन्ड पार्क मध्ये उभी केल्यास त्याबाबतचा कोणताही शुल्क ठेकेदार घेणार नाही.

१६) वाहनतळाची देखभाल करणे आणि पैसे भरा वाहन उभे करा योजना (पे ॲन्ड पार्क) चालविणे याकरीता लागणारा कर्मचारी वर्गाची नेमणुक व कर्मचा-याचा खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे. तसेच आवश्यक चौक्या, चालू स्थितीत असलेले घडयाळ आणि पैसे भरा वाहन उभे करा योजनेसाठी आवश्यक त्या इतर सुविधा यासाठी लागणारा सर्व खर्च एजंट / ठेकेदार करण्यास तयार आहे.

९३०५

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये सत्यमेव जयते Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102267

DIST. TREASURY OFFICE ★ THANE ★

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
- १ JUL 2015
मुद्रांक विक्रेता लिपीक / लिपीक

७) एजंट / ठेकेदार त्यांचे देखरेखीखाली गाडी उभी करण्याचे कामावर लक्ष देता यावे म्हणून नीटनेटका गणवेशधारी कर्मचारी वर्गाची नेमणुक करतील असे मान्य करतात.

१८) एजंट / ठेकेदार असे मान्य करतात की, वाहने उभी करण्याचे जागी उभ्या केलेल्या गाडयाच्या सुरक्षिततेची कोणतीही जबाबदारी महानगरपालिकेची नसेल. आणि वाहनतळावर उभ्या करण्यात येणा-या गाडया सर्वस्वी वाहन मालकाच्या स्वत:चे जोखमीवर उभ्या करण्यात येतील.

१९) एजंट /ठेकेदार असे मान्य करतात की, महानगरपालिकेच्या कर्मचा-यांस आणि कर्मचा-यांना किंवा महानगरपालिकेने अधिकार दिलेली कोणतीही व्यक्ती अथवा सदर जागेत प्रवेश करुन जागा तपासण्यासाठी व गाडी आणि गाडयांबद्दलचा तपशिल जो एजंट /ठेकेदार यांनी ठेवला असेल त्याबद्दल माहिती घेणेसाठी महानगरपालिकेने अधिकार दिलेल्या अधिका-यांस किंवा कर्मचा-यांस एजंट /ठेकेदार तपासण्याची परवानगी देण्याचे मान्य करतात.

२०) वाहनतळावर ठेकेदार यांनी नेमणुक केलेल्या कर्मचारी यांनी वाहनतळात असलेल्या वाहनांस कोणतेही नुकसान किंवा हानी केल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही. त्यास ठेकेदार जबाबदार राहील.

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA T 102268

DIST. TREASURY OFFICE THANE

2015

२१) मानवी आरोग्यास व जिवितास धोकादायक असणा-या आजारांची, संसर्गजन्य आजाराची किंवा लागण झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कर्मचारी म्हणून कामावर ठेवणार नाहीत. असे ठेकेदारास मान्य आहे.

२२) एजंट / ठेकेदार मान्य करतात की, प्रत्येक वेळी बालकामगार अधिनियमाच्या तरतुदींचे किमान वेतन कायदा व इतर साधर्म्य असणा-या अधिनियमांचे, फेर अधिनियमांचे व त्यांच्या बदलांचे नियमित पालन करतील. आणि सदर अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लघंन करुन अशा कोणत्याही व्यक्तीस कामावर नेमुन गाडयांवर वाहनतळाचे जागी काम करण्यास परवानगी देणार नाहीत. व तसेच गुन्हेगारी यादीत नोंद असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ठेकेदार वाहनतळावर कर्मचारी म्हणून नेमणुक करणार नाहीत.

२३) एजंट / ठेकेदार मान्य व कबुल करतात की, महापालिकेच्या मंजुरीशिवाय याठिकाणी दिलेल्या करारातील फायदे आणि विशेष हक्क किंवा त्यातील काही भाग व त्यातील कोणतेही हित संबंध इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना एजंट / ठेकेदार हस्तांतरण किंवा पोट भाडयाने देणार नाहीत.

२४) जागेचा ताबा घेणेपुर्वी माहिती व सुचनेचे पालन करणेकरीता जागेत नेहमी उपलब्ध असणा-या जबाबदार व्यक्तीचे / व्यवस्थापकांचे नाव मनपास कळविण्याची जबाबदारी एजंट /ठेकेदार

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2015 ◑ MZ 866181

DIST TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय ठाणे

JUL 2015

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक


यांची राहील. महानगरपालिकेच्या भेट देणा-या अधिका-यांकडून माहिती घेणेसाठी "पैसे भरा आणि वाहन उभे करा" जागेत नोंदवही ठेवण्यास एजंट / ठेकेदार यांच्यावर बंधनकारक आहे.

२५) करार चालू असलेल्या मुदतीत वाहन तळ चांगल्या स्थितीत ठेवण्याचे एजंट /ठेकेदार मान्य करतात.

२६) सदर जागा ही महानगरपालिकेस आवश्यक असल्यास किंवा बंद करणे आवश्यक असल्यास अशावेळी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा.आयुक्त सो., यांना सदर कराराचा कालावधी समाप्त होणेंपुर्वी सदर करार रद्द करण्याचा अधिकार राहील. आणि अशावेळी सदर लायसेन्सी (ठेकेदार) हे तात्काळ जागा खाली करतील व कोणताही मोबदला मागणेस हक्कदार राहणार नाहीत. किंवा कोणतृही पर्यायी जागा (साईट) मिळणेचा अधिकार राहणार नाहीत. या परवान्याच्या समाप्तीवेळी किंवा त्यापुर्वी करारनामा रद्द करण्यात आल्यास सदर लायसेन्सी /ठेकेदार हे सदर पार्कीग जागा खाली करुन त्याचा ताबा (कब्जा) मुळ स्थितीत महानगरपालिकेस देतील. करार समाप्त झाल्यावर महापालिकेने कालावधीत वाढ केल्यास सदर लायसेन्स (मुदतवाढ) हे वाढविलेल्या काळासाठी १० टक्के अधिक लायसेन्स फी देतील. आणि लायसेन्सी (ठेकेदार) हे त्याकरीता कबूल नसल्यास तो सदर कराराचा कालावधी संपण्यापुर्वी ३ महिने अगोदर नोटिस देईल.

२७) एजंट / ठेकेदार असे मान्य करतो की, जर सदर जागा महापालिकेला वापरात द्यावी लागली किंवा महापालिकेच्या काही कारणास्तव बंद करावी लागली तर महापालिकेस मुदती आधी करार संपविण्याची मुभा राहील. त्यावेळी एजंट / ठेकेदार सर्व जागा खाली करुन देईल. व त्यासाठी कोणतीही मोडतोड भरपाई किंवा नुकसान शुल्क मागणी आणि पर्यायी जागेची मागणी करु शकणार नाही. तथापि वाहन तळ ज्यादिवशी बंद होईल तोपर्यतचे होणारे महसूल भरावे लागेल. त्यापुढील कालावधीचा महसूल न भरण्याचे अधिकार एजंटला /ठेकेदारास राहतील.

२८) कराराची मुदत संपताच किंवा मुदतपुर्व करार संपविल्यास वाहन तळाची जागा एजंट/ ठेकेदार शांतपणे रिकामी करुन त्वरीत मनपास जागेचा ताबा हस्तांतरीत करण्याचे मान्य करीत आहेत.

२९) एजंट /ठेकेदार मान्य करतो की, सदर वाहन तळाची देखभाल, डागडुगी करताना काही भागाची मोडतोड, नुकसान झाल्यास, किंवा कोणतीही व्यक्ती किंवा त्रयस्तापैकी कोणतीही माणसे जखमी झाल्यास त्याला महापालिका जबाबदार असणार नाही.

३०) एजंट /ठेकेदार मान्य करतो की, वाहनतळामध्ये एखादया वाहनमालकांने वाहन पार्क करुन गेल्यानंतर तीस दिवसांच्या आत वाहन न घेउन गेल्यास, तर उपआयुक्त (जाहिरात) मिरा भाईदर महानगरपालिका, यांच्याकडे लेखी अहवाल २४ तासाच्या आत पाठवतील.

३१) मिरा भाईदर महानगरपालिका, महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांना कोणत्याही हानी, नुकसान, तोटा यांपासून मुक्त ठेवून नुकसान, तोटा, मोडतोड, खर्च, शुल्क, मागणी, हक्क जे असेल ते, तसेच कामगार भरपाई नियम १९२४ नुसार अधिकारी किंवा कर्मचारी भरपाईस पात्र असलेल्या नोकरांना, एखाद्या व्यक्तीला दुखापत अथवा महापालिकेच्या संपत्तीला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष झालेली नुकसान भरपाई, अपघात अथवा अन्य कोणत्याही कारणाने झालेली मोडतोड किंवा जिवीत हानी याची भरपाई देण्याचे एजंट / ठेकेदार मान्य करीत आहे.

३२) ठेकेदार मान्य करतो की, मनपाने वाहनतळाच्या जागेत एखाद्या व्यक्तीला किंवा कंपनीला मोबाईल ॲडव्हटायजिंग व्हॅन ही उभी करुन जाहिरात करण्याकरीता परवानगी दिल्यास ठेकेदार सदर वाहनांवरील फक्त मनपाने मंजुर केलेल्या दरपत्रकानुसार शुल्क आकारेल. तसेच ठेकेदार यांना सदर वाहन मालकांकडून जाहिरातीचा कोणताही मोबदला वसूल करण्याचा अधिकार राहणार नाही.

३३) ठेकेदार मान्य करतो की,मुंबई मंद्राक अधिनियम अन्वये सदर करारनाम्यावर होणारी स्टॅम्प डयुटी भरण्याची तसेच सदरचा करारनामा नोंदणीकृत करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

३४) एजंट / ठेकेदार कबुल करतो की, हया करारपत्रातील शर्ती आणि अटींचा एजंट/ठेकेदारांकडून भंग झाल्यास महापालिका, त्यांच्या किंवा तिच्या प्रित्यर्थ नियुक्त अधिकारी ३० दिवसांची सुचना /नोटिस देवून हा करार रद्दबातल करण्यास मोकळा आहे.

३५) एखादा मतभेद, तक्रार असल्यास मनपा आयुक्तांचा निर्णय सर्वोच्च असेल. आणि त्यानंतर भारतीय लवाद नियमाप्रमाणे दोघांच्या आपसातील समजूतदारीने त्यावर मार्ग काढण्यात येईल. व मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

३६) उपरनिर्दिष्ट अटी व्यतिरिक्त निविदा दस्ताऐवजात निर्दिष्ट अटी सुध्दा दोन्ही पक्षांना बंधनकारक असतील.

३७) मिरा भाईदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे एजंट /ठेकेदारास बंधनकारक असेल. व ठेकेदार ते मान्य करतात.

३८) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या मधील कायदयांचे पालन व मनपाचे धोरण पालन करण्याची जबाबदारी एजंट / ठेकेदारा याची राहील.

३९) एजंट /ठेकेदार मान्य करतो की, खालील दर्शविलेल्या पे ॲन्ड पार्क दरसुची प्रमाणे पैसे वसूल करील.

## पे अॅन्ड पार्क दरपत्रक

| अ.क्र | वाहने | तास व रुपये | तास व रुपये | तास व रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | खाजगी वाहने | ६ तासाकरीता | १२ तासाकरीता | २४ तासाकरीता | महिन्याचा पास |
| (i) | सायकल | रु.१ | रु.३ | रु.५ | १०० |
| (ii) | दुचाकी वाहने | रु.५ | रु.८ | रु.१२ | २७५ |
| (iii) | चार चाकी वाहने | रु.१० | रु.१५ | रु.२० | ४५० |
| २. | व्यावसायिक वाहने | | | | |
| (i) | दुचाकी/तीन चाकी/चार चाकी(टॅक्सी,टेम्पो,इ.हलकी वाहने) | रु.२० | रु.२५ | रु.५० | १२०० |
| (ii) | ४ सहा चाकी-(ट्रक,बस,टुरिस्ट बस,इ.जड वाहने) | रु.२५ | रु.५० | रु.१०० | २५०० |

एम.बी.एम.सी. यांचेकडे निविदा फॉर्म सोबत सादर केलेले सर्व दस्ताऐवज व निविदा या कराराचा/ठेक्याचा एक भाग मानला जाईल. त्याचे तंतोतंत पालन करणे लायसेन्सी/ठेकेदार ची जबाबदारी राहील.

यांतील साक्षीत नमुद केलेले पक्षकार व साक्षीदार यांनी या करारात..१८. जुलै २०१५ या वर्षी समक्ष स्वाक्षरी केली आहे.

यांतील नमुद केलेले पहिले पक्षकार
**मिरा भाईदर महानगरपालिका**
यांचे करीता आयुक्त
**मिरा भाईदर महानगरपालिका**
यांनी समक्ष सही केली आहे.
**साक्षीदार :-**

आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

१.

२.

यांतील नमुद केलेले दुसरे पक्षकार

मे.एस.एस. इंटरप्राईजेस
फ्लॅट नं.१०१,बी-विंग,
जुपीटर अपार्टमेंट,पुनमसागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पु) ४०१ १०७.
यांनी समक्ष स्वाक्षरी केली आहे.

मे.एस.एस.इंटरप्राईजेस
(एजंट / ठेकेदार)

**साक्षीदार :-**

१. Raghvendra Singh ... Mira Road (E) ... 401107.